दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलढाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 60 ■ रविवार, दि. 06 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल राज्याच्या वतीने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा सत्कार >> पान 2

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वैद्यकीय अधिकारी पदाचा निकाल जाहीर >> पान 3

कोळी महादेव जातीच्या प्रमाणपत्रासाठी जलसमाधी आंदोलन >> पान 4


**सुविचार**

रस्ता सापडत नसेल तर. स्वत:चा रस्ता स्वत:च तयार करा.



समंथा-नागाचैतन्यच्या घटस्फोटावरुन तेलंगणात राजकारण तापलं, थेट मंत्र्यावर १०० कोटींचा खटला !

आतील पान

# बंजारा समाजातील संतांनी देशाच्या आध्यात्मिक क्षेत्राला उर्जा दिली - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

- प्रधानमंत्र्यांच्याहस्ते बंजारा विरासत संग्रहालयाचे उद्घाटन
- ९.५ कोटी शेतकऱ्यांना पीएम किसानच्या निधीचे वितरण
- नमो शेतकरी महासन्मान योजनेचा शेतकऱ्यांना पाचवा हप्ता
- २३३०० कोटीच्या कृषी आणि पशुसंवर्धन उपक्रमांचा शुभारंभ
- कृषी पायाभूत सुविधेंतर्गत ७,५०० हून अधिक प्रकल्प समर्पित
- पशुधनासाठी स्वदेशी बनावटीच्या लिंग-वर्गीकृत वीर्य तंत्रज्ञानाचा शुभारंभ
- राज्यातील १९ मेगावॅटच्या पाच सौर ऊर्जा पार्कचे लोकार्पण







दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/ प्रतिनिधी :** बंजारा समाजाने देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात महत्वाची भूमिका निभावली. देशाच्या विकासासाठी प्रत्येक क्षेत्रात या समाजाचे काम केले. समाजाने खुप संत दिले. या संतांनी देशाच्या आध्यात्मिक क्षेत्राला उर्जा दिली. बंजारा विरासत संग्रहालयामुळे समाजाची महान संस्कृती, प्राचिन परंपरा देशाच्या नवीन पिढीला परिचित होईल, असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी येथे प्रधानमंत्र्यांच्या हस्ते बंजारा विरासत संग्रहालयाचे उद्घाटन, किसान सन्मान संमेलन तथा विविध विकास कामांचे लोकार्पण, लाभाचे वितरण झाले. त्यावेळी प्रधानमंत्री बोलत होते. यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंग चौहान, मत्स्यपालन व पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, पालकमंत्री संजय राठोड, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री धनंजय मुंडे, खा.अनुप धोत्रे, आ.चंद्रशेखर बावनकुळे, आ.निलय नाईक, आ.भावना गवळी, आ.किरण सरनाईक, आ.लखन मलिक, आ.वसंत खंडेलवाल, जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे आदी उपस्थित होते.

बंजारा समाजाच्या विरासत संग्रहालयाचे उद्घाटन करण्याचे भाग्य लाभले. उद्घाटनानंतर समाजातील काही लोकांना भेटलो. संग्रहालयामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. या कार्यक्रमासाठी उपस्थित सर्वांनी या संग्रहालयाला भेट द्यावी, असे आवाहन करतो. देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या काळात या संग्रहालयाच्या विकासासाठी प्रयत्न केले, त्यामुळे त्यांचे कौतुक करतो. संग्रहालयामुळे समाजाची महान संस्कृती, प्राचिन परंपरा देशाच्या नवीन पिढीला परिचित होईल, असे प्रधानमंत्री म्हणाले.

बंजारा समाजातील महापुरुषांनी देशाला खूप मोठे योगदान दिले. राजा लकी सिंग, संत सेवालाल महाराज, स्वामी हाती राम, संत रामराव बापू महाराजांसह अनेक संत, महंतांनी समाजाला निर्णायक नेतृत्व दिले व उत्तम मार्गदर्शन केले. केंद्र शासन या समाजाच्या विकासासाठी कार्य करीत आहे. राज्य शासनाने संत सेवालाल तांडा समृद्धी अभियान राबवून या समाजाला सक्षम करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले, असल्याचे प्रधानमंत्री म्हणाले.

नवरात्रीच्या शुभमुहूर्तावर पीएम किसान सन्मान निधी योजनेचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात वितरित करण्याचे भाग्य मला मिळाले आहे. केंद्राच्या योजनेसोबतच महाराष्ट्र सरकार शेतकऱ्यांना नमो शेतकरी महासन्मान योजनेतून निधी देत असल्याने येथील शेतकऱ्यांना दुप्पट लाभ होत आहे. केंद्र सरकारचा प्रत्येक निर्णय विकसित भारताच्या दिशेने कार्यरत आहे. शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्यादृष्टीने विविध पावले उचलण्यात येत आहेत. आज शेतकऱ्यांच्यादृष्टीने महत्त्वाच्या प्रकल्पांचे व योजनांचे लोकार्पण झाले हे या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे.

महाराष्ट्र सरकारने ५० हजार करोड रुपयांच्या वैनगंगा नळगंगा नदी जोड प्रकल्पाला मंजूरी दिली आहे. या प्रकल्पामुळे नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा या जिल्ह्यांतील १० लाख एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे. सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना महाराष्ट्र सरकार मदत करत आहे. अमरावती येथील नुकतेच टेक्सटाईल पार्कचे उद्घाटन माझ्या हस्ते झाले. राज्य शासनाने सुरु केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना नारी शक्तीला सशक्त करणारी योजना असल्याचे प्रधानमंत्र्यांनी सांगितले.

**संग्रहालयामुळे बंजारा संस्कृती, परंपरांचे दर्शन घडेल - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

बंजारा संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या नगारा विरासत संग्रहालयाचे उद्घाटन हा ऐतिहासिक व सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावा असा दिवस आहे. खऱ्या अर्थाने पोहरादेवी येथे काशी उभी राहिली असून बंजारा संस्कृती, परंपरांचे दर्शन होणार आहे. जगण्यासाठी भटकंती करणाऱ्या बंजारा समाजाला संत सेवालाल महाराजांनी जगण्याचा मार्ग दाखविला. प्रामाणिकपणे जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या या समाजाने आपली संस्कृती जपली. आता त्यांच्या या संस्कृतीचे जतन संग्रहालयाच्यामाध्यमातून होणार आहे. संत सेवालाल यांच्या स्मारकामुळे राज्याला पुढे घेवून जाण्यासाठी प्रेरणा मिळेल. राज्य शासनाने या प्रकल्पासाठी ७०० कोटीचा निधी वितरित केला आहे.

सबका साथ सबका विकास हे ब्रीद घेऊन चालणारे नरेंद्र मोदी यांनी संत सेवालाल महाराजांचे तत्व स्वीकारले आहे. प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वात देशाचा विकास होत आहे, ही देशासाठी अभिमानास्पद बाब आहे. राज्यातील जनतेच्या हिताचे निर्णय घेण्यात येत आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना सशक्त करण्याचे कार्य सुरू असून ही योजना कधीही बंद होऊ देणार नाही. या योजनेतून राज्यातील २ कोटी पेक्षा अधिक महिलांना तीन महिण्यांचे सहाय्य वितरण करण्यात आले आहे. राज्य सरकार समाजातील शेतकरी, कष्टकरी, युवक अशा सर्व घटकांना न्याय देण्याचे कार्य करीत आहे. त्यामुळे राज्य सरकार हे आता आपले लाडके सरकार झाले आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून >> पान २

## महाराष्ट्रात एनआयए व एटीएसची छापेमारी!

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** दहशतवादी संघटनांशी असलेले लागेबांधे आणि विघातक कृत्यात सहभाग प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) आणि दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) काल रात्री मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर आणि जालना येथे छापेमारी केली. यावेळी देश विरोधी कृत्यात सहभाग असलेल्या ३ जणांना ताब्यात घेतले आहे.

महाराष्ट्रात काल रात्री एनआयए आणि एटीएसने संयुक्त कारवाई केली. यात छत्रपती संभाजीनगर, मालेगाव आणि जालना शहरात छापे टाकले. जालना येथील गांधीनगर येथून एकाला, छत्रपती संभाजीनगर शहरातील आझाद चौका जवळून एकजण आणि एन-६ परिसरातून एक अशा तिघांना ताब्यात घेण्यात आले आहे. हे सर्व आरोपी देश विघातक कृत्य करण्याच्या तयारीत होते. त्यांचा देश-विघातक कृत्यात सहभाग असल्याचा संशय आहे.

संबंधित आरोपींना ताब्यात घेतल्यानंतर तीनही ठिकाणी घटनास्थळाचा पंचनामा सुरू आहे. दरम्यान, देशभरात अनेक ठिकाणी एकाच वेळी कारवाई सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, हे संशयीत जम्मू-कश्मीरमधील जिहादी दहशतवादी संघटनांशी संबंधित आहेत.

## माढा मतदारसंघावर शिवसेनेचा दावा, शिवाजी सावंतांना विजयाची खात्री, ८ ऑक्टोबरला मुख्यमंत्री घेणार निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी :** महायुतीमध्ये परंपरागत शिवसेनेकडे असणारी जागा अजित पवार यांच्या सत्तेत सहभागी होण्याने त्यांच्या गटाकडे गेली होती. मात्र अजित पवार गटाचे विद्यमान आमदार बबनदादा शिंदे यांनी पुत्र रणजित शिंदे हे महायुतीतून निवडणूक लढवणार नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळं महायुतीतून माढा मतदारसंघातून शिवसेना लढण्याच्या तयारीला लागली आहे. याबाबत ८ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोलापूर दौऱ्यात र्निणय होण्याची शक्यता असल्याचे शिवसेना शिंदे गटाचे सोलापूर संपर्कप्रमुख शिवाजी सावंत यांनी सांगितले शिवाजी सावंत हे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचे बंधू असून गेल्या ३० वर्षापासून ते माढा तालुक्यात राजकारणात सक्रीय आहेत.

माढा विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीचा पारंपारिक विरोधक म्हणून शिवसेनेने आजवर काम केले आहे. आमदार बबनदादा शिंदे यांचे कट्टर विरोधक अशी शिवाजी सावंत यांची ओळख आहे. शिंदेंच्या विरोधात जवळपास ७० ते ७५ हजार मते त्यांनी घेतली आहेत. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर अजितदादा यांच्या सोबत आलेल्या आमदार बबनदादा शिंदे यांनी लोकसभेतील पराभवानंतर अजितदादा यांची साथ सोडत पुन्हा स्वगृही म्हणजे शरद पवार गटात जाण्याची तयारी केल्याचे बोलले जात आहे.



दरम्यान, माढ्यातून शरद पवारांनी जर तिकीट दिले तर आपण मुलाला म्हणजे रणजित शिंदे यांना उभे करणार असल्याचे आमदार शिंदे यांनी सांगितले. जर तिकीट नाही मिळाले तर अपक्ष उभे करू अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यामुळं महायुतीच्या अडचणीत वाढ झाली आहे . यातच आमदार शिंदे यांनी आता महायुती हा विषय आपल्यासाठी संपल्याचे जाहीर केल्याने महायुती मधील स्थानिक नेते व कार्यकर्ते दुखावले आहेत. त्यामुळेच आता माढा मतदारसंघ शिवसेना धनुष्यबाण चिन्हावर लढून जिंकेल असा दावा शिवाजी सावंत यांनी केला आहे.

आमदार शिंदे यांना तुतारीकडून उमेदवारी मिळाल्यास शरद पवार गटातील सर्व शिंदे विरोधक त्यास टोकाचा विरोध करतील. अशा परिस्थितीत दुखावलेली अजितदादा यांची राष्ट्रवादीही शिवसेना, भाजपच्या मदतीने आमदार शिंदे यांना पराभूत करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करेल. त्यामुळेच शिवसेना धनुष्यबाण चिन्हावर ही जागा जिंकेल असा दावा शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्राध्यापक शिवाजी सावंत यांनी केला आहे. आमदार शिंदे यांना महायुतीचे तिकीट मिळणार म्हणून शिवसैनिक नाराज होते. पण आता आमदार शिंदे यांनीच महायुतीशी नाते संपवत असल्याचे जाहीर केल्याने शिवसेनेचा मार्ग मोकळा होणार आहे . सध्या शिवसेनेकडे जिल्हातील केवळ सांगोल्याची एकच जागा असून आता माढा मतदारसंघ मिळवण्याचा मार्ग सुकर झाला असल्याचे बोलले जात आहे. सध्या अजित पवार गटाकडे या विधानसभा मतदारसंघातून लढण्यासाठी केवळ कल्याणराव काळे यांचे एकच नाव चर्चेत आले असले तरी महायुतीच्या एकूण मतांचा विचार करता ही जागा शिवसेना आरामात जिंकू शकेल अशी भूमिका सावंत यांनी घेतली आहे. त्यामुळे आता आमदार बबनदादा शिंदे यांच्या विरोधात पुन्हा शिवसेना अशी पारंपारिक लढत होऊ शकणार आहे.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे ८ ऑक्टोबरला सोलापूर दौऱ्यावर येत असून त्यावेळेला माढ्याची जागा ही शिवसेनेला घेण्याबाबत पदाधिकारी भेट घेणार आहेत. जर शिंदेंना महायुती नको असेल तर महायुतीच मोठ्या फरकाने जागा जिंकून दाखवेल असा दावा शिवाजी सावंत यांनी केला आहे. आता महायुती पुढे ही जागा कोणाला द्यायची हा पेच निर्माण झाला असून यावर मार्ग काढण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून मतदारसंघ शिवसेनेला मिळवतील अशी आशा शिवसैनिकांना आहे. आता सोलापूर मध्यची जागा महायुतीत शिवसेनेला मिळणार का? यावर येथील लढत अवलंबून असेल. सध्या तरी माढ्यातून आमदार शिंदे यांचे पुत्र रणजीत शिंदे हे तुतारी किंवा अपक्ष निवडणूक लढवायच्या तयारीत आहेत. त्यांच्या विरोधात अभिजीत पाटील यांनी आधीच आपली उमेदवारी जाहीर केली आहे. आता या लढाईत शिवसेना उतरल्याने रंगत वाढणार आहे.

## लाडक्या बहिणींना पुन्हा ३००० रुपये मिळण्यास सुरुवात, बँक खाते लगेच करा चेक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची सगळीकडे चर्चा आहे. ही योजना जुलै २०२४ पासून चालू करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांना प्रत्येक महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत केली जाते. सध्या सणासुदीचा काळा आहे. हीच बाब लक्षात घेऊन राज्य सरकारने नोव्हेंबर महिन्याचे पैसे ऑक्टोबर महिन्यात देण्याचं ठरवलं आहे. त्यानुसार आता पात्र महिलांच्या बँक खात्यात ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्याचे ३००० रुपये येण्यास सुरूवात झाली आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याबाबत काही दिवसांपूर्वी घोषणा केली होती. महिलांची चिंता करू नये. दिवाळीआधी भाऊबीज म्हणून आम्ही नोव्हेंबर महिन्याचे पैसे ऑक्टोबर महिन्यातच देणार आहोत, असे अजित पवार सभेत म्हणाले होते. त्यानुसार आता महिलांना या योजनेअंतर्गत लाभ मिळण्यास सुरुवात झाली आहे. आज काही महिलांच्या बँक खात्यात ३००० रुपये जमा झालेले आहेत.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र महिलांना महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत केली जाते. राज्यात या योजनेसाठी कोट्यवधी महिला पात्र ठरल्या आहेत. या महिलांना ऑगस्ट महिन्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे ३००० रुपये पाठवण्यात आले होते. या पहिल्या दोन हप्त्यांची रक्कम १७ ऑगस्ट आणि ३१ ऑगस्टला देण्यात आली होती. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात अर्ज करणाऱ्या महिलांनाही १५०० रुपये देण्यात आले होते. सप्टेंबर महिन्यात काही महिलांच्या बँक खात्यात ४५०० रुपये आले होते. ज्या महिलांना जुलै आणि ऑगस्ट महिन्यात लाभ मिळाला नव्हता अशा महिलांना सप्टेंबर महिन्यात एकूण ४५०० रुपये देण्यात आले होते. त्यानंतर आता ऑक्टोबरमध्ये महिलांना एकूण ३००० रुपये मिळाले आहेत. पात्र ठरलेल्या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत एकूण ७५०० रुपये मिळाले आहेत.

ज्या महिलांचे बँक खाते आधार क्रमांकाशी लिंक आहे, अशाच महिलांच्या बँक खात्यावर लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा होत आहेत. त्यामुळे महिलांनी ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन राज्य सरकारकडून करण्यात आले आहे.

## अभिजात मराठी..

संपूर्ण महाराष्ट्राला व जगभरात पसरलेल्या मराठी जणांना अभिमान वाटावा अशी बातमी घटस्थापनेच्या दिवशी आली आणि महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील मराठी जणांचा ऊर अभिमानाने भरून आला. ती बातमी होती मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याची. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा हे महाराष्ट्रातील तेरा कोटी जनतेचे स्वप्न होते. हे स्वप्न साकार होण्यासाठी कैक दशकांची वाट पाहावी लागली मात्र उशिरा का होईना हे स्वप्न साकार झाले यासाठी केंद्र सरकारचे मनापासून आभार मानावे लागेल त्यासोबतच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी संघर्ष करणाऱ्या हजारो ज्ञात – अज्ञात व्यक्तींनाही सलाम करावा लागेल. केंद्र सरकारने मराठीसह पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या भाषांना देखील अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. याआधी संस्कृत, तमिळ, तेलगू, कन्नड, उडिया, मल्ल्याळम या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. आता मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने मराठीच्या श्रेष्ठत्वावर शिक्कामोर्तब झाले आहे. अर्थात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्याचा प्रवास सोपा नव्हता. एक हजार वर्ष जुनी व पाच हजार बोलीभाषेपासून तयार झालेली अमृतातही पैज जिंकणारी मराठी भाषा अभिजात भाषेसाठी लागणारे सर्व निकष पूर्ण करत असूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळत नव्हता. मराठी भाषा ही मराठी संस्कृतीचा अस्सल आधार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी शासकीय पातळीवर अनेकदा प्रयत्न झाले आहेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा अशी मागणी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केली होती, त्यासाठी आवश्यक असणारे सर्व पुरावे राज्य सरकारने केंद्र सरकारकडे सोपवून नऊ वर्ष झाली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी प्राध्यापक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली १० जानेवारी २०१२ रोजी अभिजात मराठी भाषा समिती स्थापन करण्यात आली होती. मराठी भाषेचे संशोधन करून व सूक्ष्म अभ्यास करून पुरावे गोळा करण्याचे काम या समितीकडे सोपवण्यात आले होते. प्रा रंगनाथ पठारे यांच्यासमवेत प्रा हरी नरके आणि व अन्य काही सदस्य या समितीत होते. या समितीने अतिशय सूक्ष्म अभ्यास करून मराठी भाषा अभिजात भाषेसाठी कशी पात्र आहे याचे सर्व पुरावे गोळा करून शासनाकडे सोपवले होते. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यास विरोध करणारी याचिकाही उच्च न्यायालयाने फेटाळली, तरीही मराठी भाषा अभिजात दर्जापासून वंचित होती. आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर मराठा भाषेच्या संवर्धनासाठी केंद्राकडून जास्तीचा निधी मिळेल त्यामुळे मराठी भाषेची उंची आणखी वाढेल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेची प्रतिष्ठा आणखी वाढेल. आता मराठी भाषेच्या श्रेष्ठत्वावर राज्यमान्यतेची मोहर उमटली आहे. मुख्य म्हणजे आता मराठी भाषेच्या विकास कार्याला अधिक चालना मिळणार आहे. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय होणार आहे. महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयांना सशक्त करण्यासाठी केंद्र सरकारकडून अधिकचा निधी मिळणार आहे त्यामुळे प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे सुलभ होणार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने दरवर्षी मराठी भाषेतील दोन विद्वानांना राष्ट्रीय पुरस्कार मिळतील. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेचे श्रेष्ठत्व सिद्ध झाले आहे याचा महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील मराठी जणांना अभिमान आहे. म्हणूनच अभिमानाने म्हणावेसे वाटते लाभले भाग्य आम्हास...
बोलतो मराठी....

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल राज्याच्या वतीने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा सत्कार

## देशाची सांस्कृतिक विविधता मराठी भाषेमुळे अधिक समृद्ध; प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला मराठी भाषेचा गौरव







दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : भाषा ही फक्त बोलण्याचे माध्यम नसून आपली संस्कृती, परंपरा, इतिहास आणि साहित्याशी भाषेची जोडलेली नाळ असते. आपल्या देशाची सांस्कृतिक विविधता मराठी भाषेमुळे अधिक समृद्ध होते अशा शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेल्या मराठी भाषेचा गौरव केला.

केंद्रीय मंत्रिमंडळाने ३ ऑक्टोबर रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला. यानिमित्त मराठी भाषेच्या गौरवार्थ आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मुंबईत सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, मराठी भाषा विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांच्यासह मान्यवर साहित्यिक आणि कलावंत उपस्थित होते.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल राज्याच्या वतीने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते यावेळी सत्कार करण्यात आला. तर मराठी भाषा विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर यांनी यावेळी पंतप्रधानांना मराठी ग्रंथ भेट स्वरूपात दिले.

प्रधानमंत्री श्री मोदी म्हणाले, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला हा सुवर्ण क्षण आहे. मराठीमधील ज्ञानाने अनेकांना मार्गदर्शन केले आहे हे ज्ञान आजही तेवढेच उपयुक्त आहे असे सांगून महाराष्ट्र आणि मराठी धर्म वाढवणाऱ्या संत ज्ञानेश्र्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत चोखामेळा आदींच्या परंपरेला त्यांनी दंडवत केला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा मान मिळाला हा महाराजांना केलेला मानाचा मुजरा असल्याचे ते म्हणाले. अनेक मराठी क्रांतिकारी लोकांनी जनजागृतीचे काम केले. लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, गोपाळकृष्ण गोखले आदींनी स्वराज्य मिळविण्यासाठी मनामनात चेतना निर्माण केली. भारताच्या स्वतंत्रलढ्यात मराठी भाषेचे मोठे योगदान असल्याचे सांगून मराठी भाषेने न्याय आणि समानता प्रस्थापित करण्यात मोलाचे योगदान दिल्याचे ते म्हणाले.

श्री मोदी म्हणाले, महाराष्ट्रात मराठी भाषेच्या माध्यमातून स्वराज्य, स्वसंस्कृती, स्वचेतनेचा विस्तार झाला आहे. महिला सशक्तीकरण अभियान, महाराष्ट्राचे औद्योगीकरण, कृषी क्षेत्राचा विकास या सर्वांच्या उत्कर्षाचे मूळ ही मराठी भाषा आहे. पोवाडा सारख्या लोकगीतांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज तसेच अनेक थोर पुरुषांची कीर्ती आणि गाथा जगासमोर मांडण्याचे काम आजही सुरू आहे. गणेशोत्सवातून जी भक्ती आपल्याला या भाषेच्या माध्यमातून पाहावयास मिळते ती संपूर्ण देशाला जोडण्याचे काम करते.

मराठी भाषेला हा गौरव मिळवून देण्यासाठी अनेक मोठे साहित्यिक, लेखक, कवी आणि असंख्य मराठी भाषिकांनी मोलाचे योगदान दिले आहे. मराठी साहित्याची परंपरा ही केवळ प्राचीन नाही तर ती बहूआयामी असल्याचे पंतप्रधान श्री मोदी यांनी नमूद केले. मराठी भाषेच्या उत्कर्षात सहभागी असलेल्या सर्व दिग्गज मराठी साहित्यिकांना त्यांनी वंदन केले. मराठी भाषेच्या विकासात मराठी चित्रपटांचे योगदानही मोठे आहे. मराठी रंगभूमीने समाजातील वंचित घटकांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

महाराष्ट्राने मातृभाषेतून शिक्षणाला प्राधान्य दिले असून वैद्यकीय तसेच अभियांत्रिकीचे अभ्यासक्रम देखील मराठी भाषेतून शिकविले जाणार आहेत, याचे पंतप्रधान श्री. मोदी यांनी कौतुक केले.मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे शिक्षण, संशोधन तसेच रोजगाराच्या क्षेत्राला प्रोत्साहन मिळेल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. मराठी भाषा जागतिक स्तरावर पोहोचावी अशी अपेक्षा व्यक्त करून मराठीला पुढे नेणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे, असे आवाहन त्यांनी केले.

ज्येष्ठ साहित्यिक सदानंद मोरे यांनी १ मे १९६० नंतर ३ ऑक्टोबर २०२४ हा राज्याच्या इतिहासातील महत्त्वाचा दिवस असल्याचे सांगितले. ज्येष्ठ साहित्यिक नामदेव कांबळे यांनी मराठी भाषकांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करून शिक्षण क्षेत्राचे राष्ट्रीयकरण व्हावे, अशी इच्छा व्यक्त केली. ज्येष्ठ कलावंत सचिन पिळगावकर यांनी मराठीचा सन्मान हा आईचा सन्मान झाल्यासारखे वाटते अशी भावना व्यक्त करून प्रत्येकाने आपल्या मातृभाषेवर प्रेम करावे, असे सांगितले. तर ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा म्हणजे मराठी संस्कृती, परंपरा यांना अधिकृत मान्यता मिळाल्याचे सांगून भाषेचा प्रसार आणि विकास करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य असल्याची भावना व्यक्त केली.

प्रास्ताविकात मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी ३ ऑक्टोबर रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला, ही सर्वांसाठी आनंदाची बाब असल्याचे सांगून प्रधानमंत्री श्री मोदी यांचे आभार मानले. या गौरवाचा आनंद व्यक्त करण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी अनेकांनी प्रयत्न केल्याचे सांगून राज्य शासन राबवीत असलेल्या विविध योजनांची त्यांनी यावेळी माहिती दिली. ३ ऑक्टोबर हा दिवस मराठी अभिजात भाषेचा गौरव दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

## तुम्हीसुद्धा सकाळी उठल्या उठल्या मोबाईल चेक करता का? वेळीच ही सवय बदला अन्यथा...

आजकाल मोबाईल हा जीवनाचा अतिशय महत्त्वाचा भाग बनला आहे. मोबाईल जवळ नसेल तर आपण सैरवैर होऊ लागतो. आपली सर्व कामे ही मोबाईलवरच अवलंबून असतात. म्हणून मोबाईल वापरणारे सकाळी उठल्यावर आणि रात्री झोपताना पहिले मोबाईल बघणार. इतकचे नाही तर जेवताना, झोपताना, अंघोळ करताना, फिरताना मोबाईल ही लोकांची गरज बनली आहे. म्हणूनच बहुतेक लोक मानसिक आरोग्याबद्दल चिंतित असतात. बरेच लोक सकाळी उठल्यावर बहुतेक वेळा त्यांचा मोबाईल तपास असतात. तुम्हाला ही सवय असेल तर वेळीच सावध व्हा. कारण असे वागणे आरोग्यासाठी घातक ठरु शकते.

मोबाइलमुळे रोजच्या जीवनातील कामे जितके सोपे झाले आहेत, तेवढेच मोबाइलमुळे आरोग्याच्या काही समस्याही वाढल्या आहेत. मोबाईलमध्ये व्हिडीओ पाहणे, गेम्स खेळणे, सोशल मीडिया तपासणे, गाणी ऐकणे अशा अनेक गोष्टींसाठी मोबाईल फोनचा सतत वापर केला जातो. ज्या लोकांना सकाळी उठल्या उठल्या फोन तपासण्याची सवय असते, ते त्यांचा फोन उशीजवळ ठेवून झोपतात. ज्यामुळे खूप नुकसान होऊ शकते. दरम्यान मोबाईल फोनमधून निघणाऱ्या रेडिएशनमुळे कॅन्सर, ट्यूमरसारखे जीवघेणे आजार होण्याची शक्यता वाढते. तुम्ही सकाळी उठून तुमचा मोबाईल फोन तपासता तेव्हा कोणत्या गोष्टी घडू शकतात ते जाणून घ्या...

झोपेवर परिणाम

चांगल्या आरोग्यासाठी पुरेशी झोप घेणे खूप म हत्त्वाचे आहे. परंतु जे लोक सकाळच्या वेळेस त्यांचे फोन तपासतात त्यांच्या झोपेच्या गुणवत्तेवर नकारात्म क परिणाम होतात. खरं तर, फोन स्क्रीनमधून बाहेर पडणारे किरण मेलाटोनिन हार्मोन्सच्या निर्मितीमध्ये व्यत्यय आणतात. हा हार्मोन झोपेचे नियमन करण्यास मदत करतो.

ताण वाढू शकतो

सकाळच्या वेळे मोबाईल फोन तपासताना अनेकदा नोटिफिकेशन्स, ईमेल्स किंवा सोशल मीडिया अपडेट्सम ुळे अनावश्यक ताणतणाव येत असतो. अशा परिस्थितीत तुमची नकारात्मकता वाढू शकते आणि त्यामुळे तुम्ही विनाकारण अस्वस्थ होऊ शकता. सकाळी झोपेतून उठल्यानंतर मोबाईलकडे पाहिल्याने कार्यक्षमता कमी होऊन दिवसाची सुरुवात बिघडू शकते.यामुळे तुमचा मूडही खराब होऊ शकतो आणि नकारात्मक भावना निर्माण होऊ शकतात. ज्याचा तुमच्या एकूण आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो.

एकाग्रतेचा अभाव

सकाळी उठल्यावर तुमचा बहुतांश वेळ तुमचा मोबाईल तपासण्यात आणि घडलेल्या गोष्टींचा विचार करण्यात जातो. ज्यामुळे तुम्हाला आगामी काळात तुमची एकाग्रता कमी होत असल्याचे जाणवते. एकाग्रतेच्या कमतरतेमुळे तुम्ही दिवसभर तुमच्या मनाप्रमाणे काम करु शकत नाही, जसे की ड्रायव्हिंगपासून ऑफिसमध्ये काम करण्यापर्यंतच्या कामांमध्ये तुम्हाला एकाग्रतेचा अभाव जाणवतो.

डोके आणि मान दुखणे

मोबाईल फोनचा जास्त वापर करणे आणि बराच वेळ एकाच स्थितीत बसून काम करणे. त्यामुळे डोके आणि मान दुखण्याची शक्यता वाढते. २० ते ४० वयोगटातील लोकांमध्ये हा आजार जास्त प्रमाणात दिसून येतो.

या उपायांचे पालन करा

१.रात्री झोपताना तुमचा मोबाईल बेडरूमच्या बाहेर ठेवण्याचा प्रयत्न करा.

२. नाश्ता करताना मोबाईल अजिबात वापरू नका.

३. फोन आणि इंटरनेट बंद करून रात्री झोपा.

पान १ वरून...

# बंजारा समाजातील संतांनी देशाच्या आध्यात्मिक क्षेत्राला उर्जा दिली – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी प्रधानमंत्र्यांचे आभार मानले.

**बंजारा समाजाच्या काशीचा कायापालट केला – उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

ज्यांनी बाबा विश्र्वनाथाच्या काशीचा कायापालट केला आज बंजारा समाजाच्या काशीचा कायापालट पाहण्याकरीता व त्याच्या उद्घाटनासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आले आहेत. मोदीजींचे बंजारा समाजाशी एक घट्ट नाते आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर नरेंद्र मोदी हे पोहरागडाला भेट देणारे पहिले प्रधानमंत्री आहेत.

राज्याचा मुख्यमंत्री असताना रामराव बापूंनी मला पोहरादेवीच्या विकासाची जबाबदारी दिली होती. या ठिकाणी आज बंजारा विरासत संग्रहालय उभे राहिले आहे. मंदिराचा विकास झाला आहे. पाहिलेले स्वप्न आज आम्ही पूर्ण केले. मोदीजींनी किसान सन्मान योजना आणि राज्य शासनाने नमो किसान महासन्मान योजना आणली. या योजनांचे हप्ते प्रधानमंत्र्यांच्याहस्ते आज वितरीत करण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचे आश्र्वासन राज्य शासनाने पूर्ण केले. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज पाच सौर उर्जा प्रकल्पांचे उद्घाटन होत आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल श्री.फडणवीस यांनी देखील प्रधानमंत्र्यांचे आभार मानले.

**विरासत संग्रहालय गौरवाचे प्रतिक – उपमुख्यमंत्री अजित पवार**

बंजारा विरासत संग्रहालय हे बंजारा समाजाची संस्कृती, परंपरा, वारसा, अस्मिता, इतिहास याचे गौरवशाली प्रतीक ठरेल. या संग्रहालयाच्या रूपाने एक वैभवशाली व भव्य वास्तू येथे उपलब्ध झाली. संग्रहालयाच्या माध्यमातून निसर्ग पुजक लढवय्या बंजारा समाजाच्या संस्कृती, परंपरांचे सर्वांना दर्शन घडेल असा मला विश्वास आहे. या संग्रहालयासह विकास आराखड्याची सुरुवात देवेंद्र फडणवीस यांनी २०१७ मध्ये २५ कोटी रुपये देऊन केली होती. नंतर श्री.फडणवीस यांनी १०० कोटीचा निधी जाहीर केला. त्यानंतर आता ७०० कोटींचा आराखडा शासनाने मंजूर केला आहे. पोहरादेवी तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, असे आश्र्वासन उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी दिले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल प्रधानमंत्र्यांचे आभार मानले.

**बंजारा समाजाच्या विकासासाठी राष्ट्रीय स्तरावर प्रयत्न व्हावे – पालकमंत्री संजय राठोड**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे पोहरादेवी येथे आगमन म्हणजे बंजारा समाजासाठी आणि महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. बंजारा समाजाचा इतिहास गौरवशाली आहे. देशातील या समाजाला राज्यघटनेच्या एका सूचित आणण्यासाठी सहानुभूतीपूर्वक विचार होणे आवश्यक आहे. देशभर बंजारा समाजाची संस्कृती व भाषा एकसारखी आहे. त्यामुळे बंजारा भाषेला संरक्षित करण्यासाठी तिचा राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचित समावेश करण्यात यावा, असे पालकमंत्री म्हणाले.

बंजारा तांड्यांचा चतुरस्त्र विकास होण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर तांडा विकास महामंडळ स्थापन करण्याबद्दल सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा. स्वदेश योजनेंतर्गत पोहरादेवीच्या विकासासाठी केंद्र शासनाची मदत आवश्यक आहे. यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यांमध्ये रोजगाराच्या पाहिजे त्या प्रमाणात संधी उपलब्ध नाहीत. त्यामुळे या दोन जिल्ह्यांत रोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी जीएसटीसह अन्य करांमध्ये सूट मिळणे आवश्यक असल्याचे पालकमंत्री म्हणाले.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करतांना केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र शासन सातत्याने शेतकरी हिताचे उपक्रम राबवत आहे. सोयाबीन उत्पादकांना दिलासा देण्यासाठी सोयाबीन तेलाच्या आयात निर्यातीच्या दरात आवश्यक बदल करण्यात आले. शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळावा यासाठी उत्पादन खर्चाच्या ५० टक्के अधीक दर देऊन किमान आधारभूत किंमत ठरविली जात आहे. युरीया आणि डीएपीचे दर शेतकऱ्यांना परवडण्यासारखे नाहीत, त्यामुळे यावर शासन मोठ्या प्रमाणावर अनुदान उपलब्ध करून देते, असे श्री.चौहान म्हणाले.

केंद्रीय मत्स्यपालन व पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंग म्हणाले, पशुधनासाठी युनिफाईड जिनोमिक चिप आणि स्वदेशी बनावटीच्या लिंगवर्गीकृत वीर्य तंत्रज्ञानाचा प्रधानमंत्र्यांच्याहस्ते शुभारंभ होत आहे. शेतकऱ्यांच्या पशुधनात वाढ होण्यासाठी शेतकऱ्यांना परवडणाऱ्या किंमतीत लींग वर्गीकृत वीर्याची उपलब्धता वाढविण्यासाठी हा उपक्रम सुरु करण्यात येत आहे. यामुळे वीर्याची मात्रा सुमारे २५० रुपयांपर्यंत उपलब्ध होतील. देशी पशुधनासाठी युनिफाईड जिनोमिक चिप, गौचिप आणि म्हशींसाठी माहीचिप जिनोटायपिंग सेवांसह विकसित करण्यात आल्या आहे. जनुकीय निवडीच्या अंमलबजावणीमुळे तरुण उच्च दर्जाच्या बैलांची कमी दरात निवड करणे शक्य होणार असल्याचे ते म्हणाले.

विविध उपक्रमांचा शुभारंभ, लोकार्पण व लाभाचे वितरण प्रधानमंत्र्यांनी सुरुवातीस बंजारा विरासत संग्रहालयाचे लोकार्पण केले व पाहणी केली तसेच बंजारा बांधवांशी संग्रहालयात संवाद साधला. मुख्य समारंभात ९.४ कोटी शेतकऱ्यांना २० कोटी रुपयांचा पीएम किसान सन्मान निधीचा १८ वा हप्ता वितरित केला. सोबतच राज्य शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या सुमारे २ हजार कोटी रुपयांच्या ५ व्या हप्त्याचेही वितरण केले. सुमारे २३ हजार ३०० कोटी रुपये खर्चाच्या कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्राशी संबंधित अनेक उपक्रमांचा शुभारंभ केला.

प्रधानमंत्री कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत १ हजार ९२० कोटी रुपयांचे ७,५०० हून अधिक प्रकल्प राष्ट्राला समर्पित केले. सुमारे १ हजार ३०० कोटी रुपयांची एकत्रित उलाढाल असलेले ९,२०० शेतकरी उत्पादक संघटना राष्ट्राला समर्पित केल्या. पशुधनासाठी युनिफाईड जिनोमिक चिप आणि स्वदेशी बनावटीच्या लिंग–वर्गीकृत वीर्य तंत्रज्ञानाचा शुभारंभ करण्यात आला. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना – २.० अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात १९ मेगावॅट क्षमतेचे पाच सौर ऊर्जा पार्कचे लोकार्पण करण्यात आले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थ्यांना धनादेशाचे वितरण करण्यात आले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### सप्टेंबरमधील अतिवृष्टीच्या अनुदानातून जालना जिल्हा वगळल्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून बांधावरच शासन निर्णयाची होळी

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीच्या अनुदानातून जालना जिल्हा वगळल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं बांधावरच शासन निर्णयाची होळी करत निषेध नोंदवला आहे. एक आणि दोन सप्टेंबरला जालना जिल्ह्यात सर्वच महसूल मंडळात मुसळधार पाऊस होऊन शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे नुकसान झालं होते. तसंच फळबागांचे ही मोठं नुकसान झाले होत. ४ ऑक्टोबरला शासन निर्णयात ९९७ कोटी रुपयांची मदत अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आली मात्र यात जालना जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे शासनाचा निषेध करत स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं बांधावरच शासन निर्णयाची होळी केली आहे.

### कल्याणमध्ये मुलांचे अपहरण करणारी टोळी जेरबंद; आरोपींमध्ये दोन महिलांचा समावेश



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** गुरुवारी अंबरनाथमध्ये राहणाऱ्या महिलेने महात्मा फुले पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली की ती कल्याण बस स्थानकात उतरली असताना तिच्यासोबत तिची चार मुलं होती मात्र त्यातील दोघांना अज्ञात इसमांनी फुस लावून पळवून नेले. पळवून नेण्यात आलेली मुले ही अल्पवयीन असून त्यातील एकाचे वय ९ वर्षे तर दुसऱ्याचे ६ वर्षे होते. या महिलेच्या तक्रारीनंतर गुन्हे शोध पथक व पोलीस अधिकाऱ्यांनी शोध मोहिमेस सुरुवात केली. तपास आरोपीच्या दिशेने सुरु असताना पळवून नेण्यात आलेल्या दोन मुलांपैकी एकाचा त्याच्या वडिलांना फोन आला की आम्ही चारोळी फाटा येथे आहोत. या नंतर पोलिसांनी तेथील स्थानिक नागरिकांशी संपर्क साधला व मुले आणि त्यांच्यासोबतच्या आरोपींना ताब्यात घेण्यास सांगितले. स्थानिकांनी आरोपींना व मुलांना ताब्यात घेतले. पोलिसांनी या आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांना कोर्टात हजर केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आरोपी सराईत गुन्हेगार असून यात दोन महिलांचा देखील समावेश आहे.

### चैतन्य महाराज वाडेकर अटक प्रकरणात महत्त्वाची अपडेट, बुवांनी स्वत:च स्पष्टीकरण दिले, म्हणाले...

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/ प्रतिनिधी :**प्रसिद्ध कीर्तनकार आणि सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असणाऱ्या चैतन्य वाडेकर (महाराज) यांना काही दिवसांपुर्वी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्यावर अटकेची कारवाई करण्यात आली होती. या कारवईनंतर त्यांच्याबद्दलच्या अनेक बातम्या समोर आल्या होत्या, त्यानंतर आता घटलेल्या संपूर्ण प्रकाराबाबत चैतन्य वाडेकर (महाराज) यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. प्रसार माध्यमांवर अनेक वेगवेगळ्या चुकीच्या पद्धतीच्या बातम्या माझ्या नावाने प्रसारित झाल्या आहेत असं स्पष्टीकरण आता चैतन्य महाराज वाडेकर यांनी दिलंय.

काल विविध माध्यमांवर अनेक चुकीच्या प्रकारच्या बातम्या माझ्या नावाने प्रसिध्द झाल्याचे दिसून आले. एक संत साहित्यिक अभ्यासक या नात्याने माझ्यावर असलेल्या प्रेमापोटी राज्यातील तरूणांनी फोन, मेसेज, गाठीभेटी घेऊन काळजी व्यक्त केली. माझ्या वडिलोपार्जित जमिनीमध्ये दबावतंत्र वापरून भांडवलदार बिल्डरने जागा हडपण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर कोणतीही खातरजमा न करता एक चुकीचा नेरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला गेला. माझी बदनामी करण्याच्या हेतून आणि उद्देशाने खोट्या बातम्या पसरवण्याचा प्रयत्न केला, त्या निराशाजनक होत्या. हरकत नाही. मात्र, या घटनेची सविस्तर माहिती आणि कागदोपत्री पुरावे देण्यासाठी मी पत्रकार परिषद घेणार आहे, अशी माहिती चैतन्य वाडेकर यांनी दिली आहे.

नेमकं काय आहे प्रकरण?

चैतन्य वाडेकरांनी तीन भाऊ आणि इतर साथीदारांच्या मदतीने खाजगी रस्त्यासह कंपाऊंड उखडला. चाकण एमआयडीसी हद्दीत चैतन्य वाडेकर वास्तव्यास आहेत. तिथल्याचं एका बिल्डरसोबत वाडेकर कुटुंबियांचे जमिनीवरून वाद सुरु आहेत. या बिल्डरने त्यांच्या घरा लगतची जागा विकसित केली असून, तिथं कंपनी उभारण्यात आली आहे. मात्र या बिल्डरने माझी जागा हडपली असून माझ्या जागेतून खाजगी रस्ता केल्याचा आणि कंपाऊंड टाकल्याचा आरोप वाडेकर कुटुंबीयांनी केला. याचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी सरकारी मोजणी करावी, अशी मागणी वाडेकरांकडून नेहमी करण्यात येत होती. मात्र, ही मागणी मान्यचं होत नव्हती. यावरून न्यायालयीन लढा सुरु असतानाच वाडेकरांच्या बाजूने निकाल लागला आणि सरकारी मोजणीला मान्यता मिळाली.

मात्र, यातून ही जागा वाडेकरांच्या मालकीची आहे. हे सिद्ध होण्यासाठी पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होणं, अपेक्षित होतं. न्यायालयाने मोजणीची मागणी पूर्ण करताचं चैतन्य वाडेकर हरकून गेले. त्यांनी त्यांच्या तीन भावांसह इतर साथीदारांना एकत्र केलं, जेसीबी ही मागवला आणि रात्रीतचं कंपनीकडे जाणारा खाजगी रस्ता उखडून टाकला, कंपाऊंड ही तोडून टाकला. मग प्रकरण महाळूंगे पोलीस स्टेशनमध्ये गेले.

# महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वैद्यकीय अधिकारी पदाचा निकाल जाहीर

## २८३ वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्तीचे आदेश ऑनलाईन प्रदान

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा अंतर्गत वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गातील २८३ पदांसाठी पदभरती प्रक्रिया राबविण्यात आली. यासाठी बीएएमएस शैक्षणिक पात्रता प्राप्त उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. याबाबत ३१ जानेवारी २०२४ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला असून २८३ उमेदवारांना ऑनलाईन नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आली आहेत.

या भरतीसाठी प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीचे अनुषंगाने बीएएमएस च्या २८३ पदांसाठी एकूण २२९८१ अर्ज ऑनलाईन पोर्टलद्वारे प्राप्त झाले. पदभरतीला उमेदवारांनी मोठया प्रमाणात प्रतिसाद दिल्यामुळे उमेदवारांची निवड करण्यासाठी आयबीपीएस संस्थेमार्फत दि. ०५ सप्टेंबर २०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेण्यात आली. सदर परिक्षेसाठी १८७१५ उमेदवार उपस्थित होते. ऑनलाईन परिक्षेचा ०५ ऑक्टोंबर २०२४रोजी निकाल जाहिर केला असुन निवड केलेल्या २८३ उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या पुढाकाराने ही पदभरती प्रक्रिया राबविण्यात आली.

जाहिरातीनुसार महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ पदावर निवडीसाठी ऑनलाईन पोर्टलद्वारे पात्र उमेदवारांचे अर्ज मागविण्यात आले होते. सदरचे ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दि.०१ फेब्रुवारी २०२४ ते दि. १८ फेब्रुवारी २०२४ पर्यंत देण्यात आलेली होती. या पदभरतीचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. नियुक्ती पत्र मिळाल्यामुळे निवड झालेल्या उमेदवारांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.असे विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

### हृदयद्रावक... डॉक्टर मुलाचा काविळने तर जावयाचा डेंग्यूने एकाच दिवशी अंत, नाशिकच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर

**नाशिक/प्रतिनिधी :** जिल्ह्यातून एक हृदय पिळवून टाकणारी बातमी समोर आली आहे. नामपूर येथील हिरा हॉस्पिटलचे संचालक तथा भाजपचे ज्येष्ठ नेते डॉ. सी. एन. पाटील, जिप सदस्या सुनीता पाटील यांच्या डॉक्टर मुलाचा आणि डॉक्टर जावयाचा एकाचा दिवशी मृत्यू झाला आहे. या दोघांवर एकाच दिवशी अंत्यसंस्कार करण्याची वेळ दाम्पत्यावर आली आहे. या हृदयद्रावक घटनेने नाशिकवर शोककळा पसरली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, कोरोना काळात डॉ. सी. एन. पाटील यांनी नागरिकांची अहोरात्र सेवा केली. गोरगरीब रुग्णांच्या हक्काचा दवाखाना म्हणून डॉ. पाटील यांची नाशिकमध्ये ओळख आहे. परंतु डॉक्टर मुलाचा काविळने तर जावयाचा डेंग्यूने एकाच दिवशी मृत्यू झाल्याने पाटील आणि खैरनार कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

डॉक्टर मुलाचा काविळमुळे अंत

डॉ. सी. एन. पाटील यांचा मुलगा डॉ. आदित्य चिंतामण पाटील याने लातूर वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस पदवी घेतली होती. तो वडिलांच्या व्यवसायात मदत करत होता. सुमारे २० दिवसांपूर्वी त्याला काविळची लागण झाली होती. आदित्यला उपचारासाठी आधी मालेगावला त्यानंतर नाशिकला नेण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा दुर्दैवी अंत झाला.

### समंथा-नागाचैतन्यच्या घटस्फोटावरुन तेलंगणात राजकारण तापलं, थेट मंत्र्यावर १०० कोटींचा खटला !

साउथचे फेमस जोडपं अभिनेत्री समंथा आणि नागा चैतन्य यांच्या घटस्फोटानंतर तेलंगणातलं वातावरण आता चांगलं तापलंय. तेलंगणाच्या कॅबिनेट मंत्री कोंडा सुरेखा यांनी समंथा आणि नागा चैतन्य यांच्या घटस्फोटाबद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्यानंतर नव्या वादाला तोंड फुटलं आहे. आपल्या कुटुंबाच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी नागार्जुनने (समंथाचे पूर्व सासरे) मंत्री कोंडा सुरेखा यांच्यावर फौजदारी मानहानीचा शंभर कोटी रुपयांचा खटला दाखल केलाय.

टाइम्स नऊला दिलेल्या मुलाखतीत नागार्जुन म्हणाला, त्यांनी केलेली निंद माझ्या आणि माझ्या कुटुंबाच्या सहनशक्तीच्या पलीकडे गेली आहे. असे म्हणत मानहानीचा खटला दाखल करत आक्रमक पवित्रा घेतलाच कारण त्याने सांगितलं. आम्ही मनोरंजन व्यवसायात यापुढे सॉफ्ट टारगेट राहणार नाही हे त्याने स्पष्ट केलं. स्वतः च्या राजकीय फायदांसाठी सेलिब्रिटींची नावे वापरू शकत नाहीत, यावर त्याने भर दिला.

साऊथ सुपरस्टार अभिनेत्री समंथा रूथ प्रभू व तिचा पूर्वपती नागा चैतन्य आणि सुपरस्टार नागार्जुन यांनीही या प्रकरणी संताप व्यक्त केला होता. नागार्जुन यांनी केवळ सोशल मीडिया पोस्ट करून हे प्रकरण मिटवले नाही तर त्यांनी तेलंगणाच्या काँग्रेस नेत्या कोंडा सुरेखा यांचा विरोधात मानहानीचा खटला दाखल केलाय. नुकसान भरपाई म्हणून नागार्जुन यांनी कोंडा सुरेखा यांचा विरोधात १०० कोटी रुपयांचा हा खटला उभा केलाय.

# पारदर्शी व भयमुक्त वातावरणात निवडणूक पार पाडण्यासाठी समन्वयाने काम करा - मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम

## कमी मतदानाच्या ठिकाणची कारणे शोधून मतदानाचा टक्का वाढवावा

दैनिक आपला विदर्भ



**सातारा/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या सर्व मार्गदर्शक तत्वांचे ततोतंत पालन करुन लोकांचा लोकशाही मुल्यांवरील, निवडणूक प्रक्रीयेवरील विश्र्वास वृध्दींगत करावा, पारदर्शी व भयमुक्त वातावरणात आगामी विधानसभा निवडणूक पार पाडण्यासाठी सर्वांनी दक्ष राहून समन्वयाने काम करावे. ज्या मतदारसंघामध्ये मतदानाचा टक्का राज्याच्या सरासरी मतदानाच्या टक्क्यापेक्षा कमी आहे, त्याठिकाणची कारणे शोधून त्यावर मार्ग काढावा व मतदानाचा टक्का वाढवावा. मतदार यादीतून नावांची वगळणी करत असताना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी, असे निर्देश प्रधान सचिव तथा, मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले.

विधानसभा निवडणूक विषयक तयारीचा आढावा घेण्यासाठी प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय सातारा येथे आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, उपवनसंरक्षक आदीती भारद्वाज, अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडूकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी भगवान कांबळे यांच्यासह सर्व प्रांतअधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व नोडल अधिकारी, तहसीलदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

निवडणूक विषयक तयारीचा विधानसभानिहाय आढावा घेवून प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम म्हणाले, सातारा जिल्ह्यात काही विधानसभा मतदारसंघांमध्ये गत निवडणूकीतील मतदानाचा टक्का हा राज्याच्या निवडणूक मतदानाच्या टक्क्यापेक्षा कमी आहे.याची कारणे शोधून त्याठिकाणी मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी विशेष दक्षता घेण्यात यावी,यासाठी राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, प्रसारमाध्यमे यांची मदत घेण्यात यावी.मतदान केंद्रांवर सर्व पायाभूत सुविधा सुव्यवस्थित राहतील याची खात्री करावी.प्रत्येक पात्र मतदाराला त्याचे मतदान ओळखपत्र मिळेल याबाबत दक्षता घ्यावी. मतदारयादीतून नावांची वगळणी होत असताना भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे. जास्त गर्दी होणा-या मतदान केंद्रांवर मतदारांच्या लांबच लांब रांगा टाळण्यासाठी बैठक व्यवस्था करावी, यासाठी टोकन पध्दती अंमलात आणावी. मतदान कक्षामध्ये एकावेळी चार व्यक्तींना प्रवेश द्यावा, व्हीव्हीपॅट व पॉवर पॅक पुरेशा प्रमाणात उपलब्ध राहतील हे कटाक्षाने पहावे.

महाराष्ट्र हे प्रगत राज्य असून निवडणूकीमध्ये तपासणी पथकांकडून जप्त करण्यात येणाऱ्या मुद्देमालांची संख्या अत्यंत कमी असते असे सांगून एस चोक्कलिंगम म्हणाले, या निवडणूकीमध्ये एफएसटी, एसएसटी पथकांनी अत्यंत दक्ष राहून कारवाई करावी. कोणत्याही पध्दतीने पैश्याचे अथवा अन्य बाबींचे प्रलोभन देवून मतदान प्रक्रीयेवर प्रभाव टाकला जाणार नाही याबाबत सर्वोतपरी काळजी घ्यावी, लोकांना पारदर्शी व भयमुक्त वातावरणात मतदान करता यावे यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे.

कोणत्याही स्थितीत निवडणूक यंत्रसामुग्रीसाठी ताटकळत उभे रहावे लागू नये यासाठी सेक्टर अधिकारी नियुक्त करुन त्यांच्यामार्फत पोलिंग पार्टीना यंत्रसामुग्री देण्यात यावी व त्याच पध्दतीने जमाही करुन घेण्यात यावी. निवडणूकीसाठी नियुक्त मनुष्यबळांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात यावे.

निवडणूक आयोगाला कळविण्यात येणारी विविध प्रकारची माहिती अत्यंत बिनचूक असावी, तपासणी नाके कार्यरत करावेत. लक्झरी बसेस, खाजगी वाहने यांच्याबरोबरच हेलिकॉप्टर यांचीही काटेकोरपणे तपासणी व्हावी. प्रचार कालावधीमध्ये सामाजिक सौदार्ह बिघडवणारी वक्तव्ये झाल्यास त्वरीत कारवाई करण्यात यावी.

बैठकीत जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी येणाऱ्या विधानसभा निवडणूकीमध्ये सत्तर टक्क्यापेक्षा जास्त मतदान व्हावे, यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येतील, बोगस मतदार नोंदणीसंदर्भात घेण्यात आलेल्या आक्षेपांचे विहीत मुदतीत निराकरण करण्यात येईल असे सांगून जिल्ह्यात करण्यात आलेल्या निवडणूक विषयक तयारीचा आढावा सादर केला. पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या अनूषंगाने करण्यात येत असलेल्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.

बैठकीत राज्य उत्पादन शुल्क विभाग, आचारसंहिता, मनुष्यबळ, बॅलेटपेपर, दळणवळण, इव्हीएम, सामग्री, माध्यमप्रमाणीकरण व संनियंत्रण आदी सर्व विषयांच्या अनुषंगाने आढावा घेण्यात आला.

# महिलांवरील वाढत्या अत्याराच्या घटना रोखण्यासाठी पोलीसांची गस्त वाढवावी - विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

## निर्जनस्थळी पोलीस चौकी अद्ययावत कराव्यात, सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत, गस्त घालते वेळी सायरनचा वापर करण्याचे पोलिसांना निर्देश


दैनिक आपला विदर्भ

**पुणे/ प्रतिनिधी :** पुणे शहरात तसेच परिसरात गेल्या काही दिवसात महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना लक्षात घेता पोलीस विभागाने अधिक सतर्क राहून अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी पोलीसांची गस्त वाढवावी असे निर्देश दिल्याचे विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.

पोलीस आयुक्त कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. गोऱ्हे बोलत होत्या. यावेळी पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार उपस्थित होते.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, पुणे शहर आणि परिसरात महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. ही बाब अत्यंत चिंताजनक असून पोलीसांनी आरोपींना पकडून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी. बोपदेव घाट, दिवे घाट, वेताळ टेकडी, एनडीए परिसर तसेच अन्य निर्जन स्थळी नागरिकांच्या संरक्षणासाठी गस्त वाढवावी. गस्त घालते वेळी सायरनचा वापर करावा. निर्जन स्थळी असलेल्या पोलीस चौकी अद्ययावत कराव्यात. तसेच या ठिकाणी रात्रीच्या वेळी प्रभावशील प्रकाश झोताची आणि भोंग्यांची व्यवस्था करावी. अशा ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावून त्याची वेळोवेळी देखरेख व्हावी. याबाबतची माहिती सुरक्षिततेच्या दृष्टीने नागरिकांना होणे गरजेचे आहे. यासाठी पुरेशी प्रसिद्धी द्यावी अशी सूचना पुणे पोलिसांना दिल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या काही वर्षात तात्काळ पैसा कमावण्याच्या मोहामुळे गुन्हेगारी वाढत असल्याचे दिसून येते. यांचेवर विविध प्रकारे वचक ठेवणे आवश्यक आहे. महिला दक्षता समित्यांच्या बैठकांमधून फलनिष्पत्ती काय झाली, तक्रारींचा निपटारा कसा केला याबाबतचा कृती अहवाल दक्षता समितीमधील महिला सदस्यांना द्यावी. यामुळे गुन्हेगारी नियंत्रणात येवू शकते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विविध कक्ष स्थापन करण्याच्या सूचना आहेत. त्यानुसार ज्येष्ठ नागरिक कक्ष, जात पंचायत निर्मूलन कक्ष, अंध श्रद्धा निर्मूलन कक्ष तसेच मानवी तस्करी संदर्भातील कक्ष स्थापन होणे आवश्यक आहे. काही ठिकाणी घरातील व्यक्तिंकडूनच महिलांवर आणि मुलींवर अत्याचार होताना दिसत आहेत. अशा वेळी नातेवाईकांनी पुढे येवून पोलीसांकडे तक्रार देणे आवश्यक आहे. सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या अत्याचारामध्ये शाळा, महाविद्यालयाच्या तसेच स्कूल



बसचे वाहनचालक आणि वाहक यांची चारित्र्य पडताळणी होणे आवश्यक आहे. शाळांमध्ये गांभीर्यपूर्वक 'बॅड टच गुड टच' याची कार्यशाळा आणि मार्गदर्शन व्हावे. शहरात नवीन पोलीस ठाणे वाढविण्याबाबत शासन सकारात्मक असून त्यादृष्टिने प्रयत्न सूरू आहेत.

पोलीसांनी गुन्हेगारांवर केलेल्या कारवाई संदर्भातील यशकथा प्रसारमाध्यमातून वेळोवेळी प्रसिद्ध होणे आवश्यक आहे. यामुळे समाजातील नागरिकांचा कायद्यावरील विश्र्वास वाढण्यास मदत होईल. पुणे शहर व परिसरातील गुन्हेगारी कमी होण्यासाठी पोलीस विभागाने सदैव तत्पर राहण्याच्याही सूचना देण्यात आल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

## विविध वृत्त...

### केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा दौरा

दैनिक आपला विदर्भ



**बुलडाणा/ प्रतिनिधी :** केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार), आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री श्री प्रतापराव जाधव हे रविवार, दि. ६ ऑक्टोबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत.

त्यांच्या दौऱ्यानुसार, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचे मेहकर येथून सकाळी १० वाजता खामगांव येथे आगमन होईल. त्यानंतर खामगांव येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत विविध कार्यक्रमांना उपस्थित राहतील. खामगांव येथून सोयीनुसार मेहकरकडे रवाना होतील.

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दौरा

**बुलडाणा/ प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस हे रविवार, दि. ६ ऑक्टोबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत.



त्यांच्या दौऱ्यानुसार उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांचे सकाळी १० वाजता सिद्धीविनायक टेक्नीकल कॅम्पस, खामगांव येथील हेलिपॅड येथे आगमन होईल. सकाळी १०.२० वाजता जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, खामगांव येथे आगमन व सकाळी १०.४० वाजता नूतन जिल्हा व अतिरिक्त न्यायालय तसेच दिवाणी व फौजदारी न्यायालय इमारतीच्या कोनशिला समारंभास उपस्थित राहतील. त्यानंतर सकाळी ११.१५ वाजता खामगांव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन/लोकार्पण करतील. दुपारी १२.३० वाजता खामगांव येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

### साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ; विविध योजनेंतर्गत लाभ्यार्थ्यांची चिठ्ठीव्दारे निवड

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/ प्रतिनिधी :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत विविध योजनेअंतर्गत ईश्वरचिठ्ठीव्दारे लाभार्थीची निवड डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे दि. ८ ऑक्टोंबर रोजी दुपारी १२ वाजता होणार आहे.

महामंडळामार्फत प्रकल्प मर्यादा पाच लाख रुपये व समृद्धी योजनेंतर्गत प्रकल्प मर्यादा एक लाख ४० हजार रुपये कर्ज योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. सुविधा कर्ज योजनेचे १२५ कर्ज मागणी अर्जापैकी ११७ अर्ज पात्र तर ८ अर्ज आपात्र ठरले आहे. महिला समृद्धी योजनेचे ३३ कर्ज प्रस्तावाला मान्यता दिली असून त्यामधुन २५ महिला लाभार्थ्यांची निवड करावयाची आहे. पात्र अर्जाची यादी महामंडळ कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात आली आहे, याची नोंद घ्यावी. तसेच लाभार्थ्यांनी बैठकीकरीता उपस्थित राहावे, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक जे. एम. गाभणे यांनी केले आहे.

### वैयक्तिक लाभाच्या योजनासाठी लाभ्यार्थ्यांची चिठ्ठीव्दारे निवड

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/ प्रतिनिधी :** जिल्हा परिषदच्या महिला बालकल्याण विभागामार्फत विविध योजनांच्या लाभार्थ्यांची निवड दि. ७ ऑक्टोंबर रोजी सकाळी ११ वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, जिल्हा परिषद येथे ईश्र्वर चिठ्ठीव्दारे करण्यात येणार आहे. तरी लाभार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

### देशातील ९.४ कोटी शेतकऱ्यांची प्रतीक्षा संपली, दिवाळीपूर्वीच पीएम किसानचे २००० रुपये आले; लगेच बँक खाते करा चेक!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शेतकरी गेल्या अनेक दिवसांपासून पीएम शेतकरी सन्मान योजनेच्या १८ हप्त्याची वाट पाहात होते. दरम्यान, आज (५ ऑक्टोबर) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या १८ व्या हप्त्याच्या वितरणास प्रारंभ करण्यात आला. नरेंद्र मोदी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर होते. वाशिममध्ये असताना त्यांनी या १८ व्या हप्त्याच्या वितरणास प्रारंभ केला.



९.४ कोटी शेतकऱ्यांना लाभ मिळणार

पीएम शेतकरी सन्मान निधी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना एक वर्षात एकूण ६००० रुपये दिले जातात. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना आतापर्यंत १७ हप्त्यांमध्ये ३४ हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे. शेतकरी या पैशांचा उपयोग पेरणी, कापणी तसेच शेतीच्या अन्य कामांसाठी करतात. आता शेतकऱ्यांना १८ व्या हप्त्याच्या वितरणास सुरुवात झाली आहे. देशभरातील ९.४ कोटी शेतकऱ्यांना हा लाभ मिळणार आहे. या योजनेअंतर्गत १८ व्या हप्त्याच्या वितणासाठी केंद्र सरकारने एकूण २० हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

# कोळी महादेव जातीच्या प्रमाणपत्रासाठी जलसमाधी आंदोलन

## नारेबाजी देत आंदोलकाच्या धरणात उड्या : घटनास्थळी रेक्स्यू टीम, पोलीस प्रशासनाचा बंदोबस्त

दैनिक आपला विदर्भ





**बुलडाणा/ प्रतिनिधी :** कोळी महादेव जातीचे प्रमाणपत्र द्यावे,या मागणीसाठी दि. ५ ऑक्टोबर रोजी कोळी महादेव समाज बांधवांनी नळगंगा धरण पुलावर जलसमाधी आंदोलन केले. या आंदोलनामुळे मात्र प्रशासनाची एकच धावपळ मिळाली. आदिवासी कोळी महादेव जातीचे प्रमाणपत्र द्यावे या मागणीसाठी आदिवासी कोळी महादेव समाजाकडून अनेक वर्षापासून पाठपुरावा केला जात आहे. वारंवार निवेदने व मागणी करू नये प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे. आदिवासी कोळी महादेव समाज बांधवाच्या वतीने दि.५ ऑक्टोबर रोजी नळगंगा धरण येथे जलसमाधी घेणार असल्याचा प्रशासनाला इशारा दिला होता. त्यानंतरही याकडे दुर्लक्ष केल्याने आदिवासी कोळी महादेव समाज बांधवांच्या वतीने दि.५ ऑक्टोबर रोजी १२ बारा वाजताच्या दरम्यान आंदोलकांनी नळगंगा धरण परिसरात असलेल्या पुलावरून नारे बाजीकरून धरणात उड्या घेतल्या.

या घटनेची माहिती प्रशासनाला कळताच रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल करून पोलीस बंदोबस्त तैनात केला. एका आंदोलने उडी घेताच रेस्क्यू टीमने त्या आंदोलकाला पाण्यातून बाहेर काढून ताब्यात घेण्यात आले व बाकी आंदोलकांना मोताळा तहसीलदार हेमंत पाटील व बोराखेडी पोलीसांनी शांततेत समजावून या विषयावर लवकरच मार्ग काढू असे आश्र्वासन दिले. परंतु आंदोलक आम्हाला कोळी महादेव जातीचे प्रमाणपत्र द्या यावर ठाम होते.

### प्रशासनाकडून असहकार्याची भूमिका

गत दोन महिन्यापासून मलकापूर उपविभागीय अधिकारी यांच्याकडे प्रकरण सादर केले आहे. परंतु त्यांनी ते नामंजूर केले, आम्ही त्यांना कोणत्या त्रुटी आहेत ते आम्ही पूर्ण करण्यास तयार आहे.या संदर्भात अनेकदा भेटलो. परंतु त्यांनी आमच्याबद्दल कोणतीही सकारात्मकता दाखवली नसल्यामुळे आज नळगंगा नदीच्या पात्रात आंदोलकांनी उड्या मारून आपले जीवन संपवण्याचा निर्णय घेतला होता.

**–गंगाधर तायडे**

### तहसीलदाराकडून आंदोलकाची समजूत

उपविभागीय अधिकारी हे सध्या ट्रेनिंगमध्ये असून ते १२ तारखेला परत येतील. त्यानंतर समुपचाराने याबाबत निर्णय घेऊ, असे सांगत मोताळा तहसीलदार हेमंत पाटील यांनी आंदोलकांची समजूत काढली.

## मुकेश अंबानींची म्युच्यूअल फंडात एन्ट्री, जिओ–ब्लॅकरॉकला सेबीने दिली मंजुरी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भांडवली बाजार नियामक संस्था सेबीने म्युच्यूअल फंड मार्केटशी निगडीत मोठा निर्णय घेतला आहे. सेबीने जिओ आणि ब्लॅकरॉक यांना म्युच्यूअल फंडात येण्यास मंजुरी दिली आहे. उद्योगपती मुकेस अंबानी यांच्या नेतृत्त्वातील जिओ फायनॅन्शियल सर्व्हिसेस च्या म्युच्यूअल फंडातील प्रवेशामुळे या क्षेत्रातील स्पर्धा वाढू शकत.

जिओ फायनॅन्शियलने शुक्रवारी एक्स्चेंज फायलिंगमध्ये याबाबत अधिक माहिती दिली आहे. जिओ फायनॅन्शियलने दिलेल्या माहितीनुसार ३ ऑक्टोबर रोजी ब्लॅकरॉक फायनॅन्शियल मॅनेजमेंटसोबतच्या संयुक्त व्हेंचरला म्युच्यूअल फंडात प्रवेश करण्यास तत्त्वत: मंजुरी देण्यात आली आहे. जिओ आणि ब्लॅकरॉक या दोन्ही कंपन्यांनी सर्व आवश्यक कागदपत्रे सेबीकडे सुपूर्द केल्यानंतर त्यांच्या या व्हेंचरला अंतिम मंजुरी दिली जाईल. या दोन्ही कंपन्यांनी जुलै २०२३ मध्ये एकमेकांशी करार केलेला आहे. म्युच्यूअल फंड मार्केटमध्ये प्रवेश मिळावा या दोन्ही कंपन्यांनी संयुक्तपणे ऑक्टोबर २०२३ मध्ये परवान्यासाठी सेबीकडे अर्ज केला होता. या दोन्ही कंपन्या त्यांच्या नव्या प्रकल्पासाठी १५–१५ कोटी डॉलर्सची गुंतवणूक करणार आहेत.

ब्लॅकरॉक आणि जिओच्या या जॉइंट व्हेंचरला मंजुरी मिळाल्यानंतर ब्लॅकरॉक कंपनीच्या रेचल लॉर्ड यांनी प्रतिक्रिया दिली. सेबीच्या या निर्णयामुळे आम्हाला आनंद झाला आहे. आम्ही भारतातील कोट्यवधी लोकांना स्वस्त आणि चांगला गंतवणूक पर्याय उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करू. जिओ फायनॅन्शियल सर्व्हिस या कंपनीसोबत हातमिळवणी करून आम्ही भारताला बचत करणाऱ्या देशापासून गुंतवणूक करणाऱ्या देशात बदलण्यासाठी प्रयत्न करू. ब्लॅकरॉक आणि जिओ फायनॅन्सियल सर्व्हिसेस या दोन्ही कंपन्या वेल्थ मॅनेजमेंट आणि स्टॉक ब्रोकिंग बिझनेसमध्ये काम करणार आहेत.

### शिवसेनेचा जुना शिलेदार हरपला, माजी आमदार सीताराम दळवी यांचे मुंबईत निधन

**मुंबई/प्रतिनिधी :** राजकीय वर्तुळातून एक दुखद बातमी समोर आली आहे, शिवसेनेचे माजी आमदार सीताराम दळवी यांचं आज निधन झालं आहे. अंधेरी विधानसभा मतदार संघातून १९९५ ला शिवसेनेच्या तिकीटावर ते विजयी झाले होते. त्यापुर्वी मुंबई महापालिकेत नगसेवक म्हणून ही विजयी झाले होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या सोबत काम केलेल्या निष्ठावान शिवसैनिका पैकी ते एक होते. शिवसेनेच्या उभारतीच्या काळात मुंबई आणि महाराष्ट्रात झालेल्या पक्षाच्या अनेक आंदोलनात त्यांचा सहभाग होता.

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हयातील आरोस हे त्यांचे मुळ गाव असून त्यांचे मुंबईतील अंधेरी पूर्व येथे त्यांचे अखेरपर्यंत वास्तव्य होते. मनसे नेते संदिप दळवी यांचे ते वडिल होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा संदिप, मुलगी अँड प्रतिमा आशिष शेलार , सुना नातवंडे असा परिवार आहे. आज संध्याकाळी ६ वाजता अंधेरीतील राहत्या घरातून त्यांची अंत्ययात्रा निघेल.

## मालकाने चालकाची हत्या करून मृतदेह जंगलात पुरला; दोघांना अटक, चार ते पाच आरोपी फरार

दैनिक आपला विदर्भ



**गोंदिया/ प्रतिनिधी :** ड्रायव्हर मालकाकडून उसनवारीवर घेतलेले पैसे परत करत नव्हता आणि कामावरही येत नव्हता. यातून मालक व ड्रायव्हर यात तणाव निर्माण झाला. यातूनच मालकाने इतरांच्या मदतीने आपल्या ड्रायव्हरची हत्या करून पुरावा नष्ट करण्यासाठी त्याचा मृतदेह जंगलात पुरला. पानटपरीवर सुरू असलेल्या चर्चेवरून हा सर्व प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणात दोघांना अटक करण्यात आली आहे. शांतनू अरविंद पशिने (३६, रा. मोहगाव, गंगेरुवा, जि. शिवनी– मध्य प्रदेश), असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. गोंदिया शहरातील गौतम नगर परिसरातील आरोपी विक्रम उर्फ विक्की पवन सिंग बैस (३६) याच्या घरी कार चालविण्यासाठी शांतनू अरविंद पशिने हा कामावर होता. त्याने मालकाकडून ८० हजार रुपये उसनवारीवर घेतले होते. ड्रायव्हर शांतनू पैसे परत करत नव्हता आणि कामावरही जात नव्हता. त्यामुळे विक्रम व शांतनू यांच्यात वाद झाला. या वादातून शांतनू पशिने याला काठ्यांनी मारून त्याची हत्या केली.

या प्रकरणात पोलिस निरीक्षक किशोर पर्वते हे स्वतः फिर्यादी झाले व त्यांनी आरोपींवर भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), २३८, ३(५) अन्वये गुन्हा नोंद केला. या गुन्ह्यातील चार ते पाच आरोपी फरार आहेत त्यांचा शोध पोलीस घेत आहे आहेत.

## बेलगाव येथे सायकल वितरण कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव



**डोणगाव:** येथून जवळच असलेल्या बेलगाव येथील महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालय येथे दि.५ ऑक्टोबर २०२४ रोजी विद्यार्थ्यांना सायकल वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक कुटे हे होते. तर पालक अशोक राठोड यांच्यासह इतर मान्यवरांचे प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शासनातर्फे मिळालेल्या १५ सायकलीचे वितरण विद्यालयांमध्ये मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मनोगत व्यक्त करताना मुख्याध्यापक दीपक कुटे यांनी विद्यार्थिनींनी सायकलीचा उपयोग करून नियमित शाळेमध्ये यावे शिक्षणाचा लाभ घ्यावा व जीवनामध्ये प्रगती साधावी, या सायकलने शाळेमध्ये नियमित येण्यास व उपस्थिती राहण्यास विद्यार्थ्यांना मोठी मदत होणार आहे. सातत्यपूर्ण अभ्यास आणि त्यासोबतच व्यायामाची जोड देऊन निरोगी व प्रगतिशील जीवन जगावे, उच्च पदावर जाण्याचे ध्येय ठेवून त्यासाठी सतत परिश्रम घ्यावे, असे आवाहन कुटे यांनी केले. तसेच यावेळी इतर मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून शाळेचे कौतुक केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक कावरखे. वानखेडे, गीते, मेटांगळे, राहटे, जायभाये,गायकवाड, बागुल,साखरे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी विजय दाभाडे गजानन देशमुख यांन परिश्रम घेतले.

### शिवरायांचा राज्याभिषेक रोखणारी विचारधारा, नियत खोटी असल्याने राजकोट किल्ल्यावरचा पुतळा पडला: राहुल गांधी

**कोल्हापूर/ प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराजांनी आयुष्यभर एक विचारधारा मनात बाळगून संघर्ष केला. हा देश सर्वांचा आहे, आपल्याला सगळ्यांना घेऊन चालायचे आहे, हा संदेश शिवाजी महाराजांनी संपूर्ण जगाला दिला. भारताचे संविधान हे शिवाजी महाराजांच्या विचारांचे प्रतीक आहे. मित्र, आज देशातील एक विचारधारा हे संविधान संपवण्याच्या योजना आखत आहे. याच विचारधारेच्या लोकांनी राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला होता. पण त्यांची नियत खोटी असल्याने हा पुतळा पडला. एकीकडे शिवाजी महाराजांच्या पायावर डोके टेकवायचे आणि त्यानंतर २४ तास त्यांच्या विचारधारेविरोधात काम करायचे, ही त्यांची वृत्ती आहे. त्यामुळे राजकोट किल्ल्यावरील पडलेल्या पुतळ्याने एक संदेश दिला आहे की, शिवरायांचा पुतळा उभारला जात असेल तर संबंधितांकडून त्यांच्या विचारांचं संरक्षण झालं पाहिजे, असे राहुल गांधी यांनी म्हटले. ते शनिवारी कोल्हापुरात कसबा बावडा परिसरात आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्यात बोलत होते.

# ११८३६ शेतकऱ्यांना प्रोत्साहन पर योजनेचा लाभ

## महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/ प्रतिनिधी :** महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजने ११८३६ शेतकऱ्यांना लाभ मिळाला आहे.

महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ज्या शेतकऱ्यांनी मागील महिन्यात आधार प्रमाणीकरण केले आहे. अशा ११८३६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ४६७० लाख रुपयांची रक्कम शासनामार्फत जमा करण्यात आली आहे. यामध्ये यवतमाळ जिल्ह्यांतील ८२९ शेतकऱ्यांना ३५२ लाख रुपये, जळगांव जिल्ह्यातील ७२९ शेतकऱ्यांना ३०७ लाख रुपये, नाशिक जिल्ह्यातील ७१३ शेतकऱ्यांना ३५४ लाख रुपये रक्कमेचा लाभ देण्यात आला आहे.या प्रोत्साहनपर लाभ योजनेतंर्गत ३३३५६ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केले नसल्याचे शासनाच्या ऑगस्ट २०२४ मध्ये निदर्शनास आले होते. त्यामुळे या शेतकऱ्यांना ५० हजारा रुपये पर्यतच्या प्रोत्साहनपर योजनेचा लाभ मिळाला नव्हता. या शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणाची संधी दि. १२ ऑगस्ट २०२४ ते ३० सप्टेंबर २०२४ या कालावधीत देण्यात आली होती. या कालावधीत आधार प्रमाणीकरण केलेल्या ११८३६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ४६.७० कोटीची प्रोत्साहनपर लाभाची रक्कम दि.१ ऑक्टोबर २०२४ रोजी वर्ग करण्यात आली आहे. तसेच जे शेतकरी आधार प्रमाणीकरण करण्यापूर्वी मयत झाले आहेत अशा शेतकऱ्यांना वारसांची नांवे योजनेच्या पोर्टलवर समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या प्रक्रियेनंतर आधार प्रमाणीकरण व योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.या योजनेमध्ये सन २०१७–१८, २०१८–१९, २०१९–२० या तीन वर्षामध्ये कोणत्याही दोन वर्षात बँकेकडून पीक कर्जाची उचल करुन नियमित परतफेड केलेली आहे अशा एकूण १४.५० लाख शेतकऱ्यांना आजपर्यंत एकूण ५३१० कोटी रुपये रक्कमेचा लाभ देण्यात आला आहे.